**<u>प्रतिवादी क्र.१ तर्फे उलटतपास – श्री. डी. जे. देसाई वकील.</u>**

९. आमच्या जमिनीतून रस्ता गेल्यामुळे तिचे पुर्व– पश्चिम असे दोन भाग झाले आहेत. त्या जागेच्या पश्चिमेकडील भागात आमच्या भावांनी घरे बांधलेली आहेत. प्रतिवादी क्र.१ ने बांधलेल्या घरालगत आमच्या वडिलांचे जुने घर असून ते आज रोजी पडलेले आहे. वडिलांनी बांधलेले घर मोडकळीस आल्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने नवे घर बांधले आहे. आमच्यामध्ये दावा मिळकतीचे अद्याप पर्यंत सरस– निरस मानाने वाटप झालेले नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र.२ तर्फे उलटतपास – श्री. एन. जी. आजरेकर वकील.</u>**

**१०.** माझ्या लग्नाला ३० वर्षे झाली आहेत. मला अडकूर येथे दिलेली लक्ष्मी पोवार नावाची एक मोठी बहिण आहे. माझे लग्न चंदगड येथील मोटणवाडी येथे झाले आहे. माझ्या सासरची तेथे शेतीवाडी असून आम्ही कायमस्वरुपी आजरा येथे राहतो.

**११.** मला इतर वादींनी त्यांच्या वतीने पुरावा देण्यासाठी वटमुखत्यारपत्र दिलेले नाही. मला दावा मिळकतीचा गट क्रमांक व सर्वे क्रमांक लक्षात नाही. मला त्या जमिनीचा शेतफाळा किती आहे याची माहिती नाही. मला दावा मिळकतीच्या चतुःसिमा सांगता येणार नाहीत. दावा मिळकतीत आमचे वडिलार्जित घर आहे. आम्ही दाव्यामध्ये ते घर समाविष्ट केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या पुर्व भागात प्रतिवादी क्र.२ ने एकटयाने भात पिक केले आहे. दावा मिळकती मधून आजरा–पोळगाव रस्ता गेला आहे.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या सन २०१७ साली वाटण्या झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या वाटणीत दावा मिळकतीतील रस्त्याच्या पुर्वेकडील भाग प्रतिवादी क्र.२ ला आणि पश्चिमेकडील भाग प्रतिवादी क्र.१ ला दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या वाटणीमध्ये प्रतिवादी क्र.१ ला दिलेल्या जमिनीच्या पश्चिमेला शिल्लक असलेली २ एकर जमीन आम्हा बहिणींना दिलेली आहे. जमिनीतून रस्ता गेल्यामुळे त्यासाठी अर्धा एकर जमीन गेलेली असेल.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत आमची कधीही वहिवाट नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ लहानपणी बाहेरगावी काम करत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे प्रतिवादी क्र.२ ने दावा मिळकतीमध्ये काजू व मेसकाठया लागवड करुन

वाढवले आहेत. आम्ही प्रतिवादींकडे वाटणी मागितल्यावर त्यांनी कायद्याने घ्यायला सांगितली होती. मला सदर घटना कोणत्या तारखेला घडली हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ३०.०९.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA